# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र.2194/शि.वि./2016
दि. 4/06/2016

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्यमिक शाळा,
म.न.पा. नागपूर.

**विषय :– शाळांमार्फत विद्यार्थ्यांच्या पालकांकडून हमीपत्र सादर करण्याबाबत.**

संदर्भ:– मा.सभापती, शिक्षण समिती,म.न.पा., नागपूर यांचे दि.29.06.2016 चे पत्रान्वये.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, म.न.पा. अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील वर्ग नर्सरी ते 8 वी व 9 ते 12 वर्गातील विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत तसेच मनपा तर्फे दोन गणवेष मोफत देण्यात येतात. परंतु मागील सत्रात मा. शिक्षण सभापती यांनी प्रत्यक्ष शाळेत भेटी दिल्या असत्या काही विद्यार्थ्यांना एकच गणवेष शाळेतर्फे देण्यात आला. तर काहींना गणवेषच मिळाले नाही. काही बालकांना प्रत्येकी दोन गणवेष प्राप्त झाले याबाबत बऱ्याच तक्रारी मा.सभापती, शिक्षण समिती यांना प्राप्त झाल्या. याची पुनरावृत्ती चालू सत्रात होवू नये म्हणून बालकांना दोन गणवेष दिल्यानंतर त्यांच्या पालकांकडून दोन गणवेष प्राप्त झाल्याबाबत सोबत दिलेले हमीपत्र भरून घ्यावे व ते शाळा निरीक्षक यांचेकडे सादर करावे. हा शालेय रेकॉर्ड शिक्षण विभागात जपून ठेवण्यात येईल. जेणेकरून अश्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्वरीत तक्रारीचे निवारण करता येईल.

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर

# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

### हमीपत्र

मी. श्री. / श्रीमती .................................................................. या हमीपत्राव्दारे कार्यालयास कळवितो की, माझ्या / माझी पाल्य / पाल्या नाव ................................................ शाळेचे नाव ................................................ मध्ये सन 2016–17 या सत्रात वर्ग .......... मध्ये शिक्षण घेत असून सर्व शिक्षा अभियान मोफत गणवेष योजनेअंतर्गत आज दि......./......./2016 रोजी शाळेकडून दोन जोडी गणवेष प्राप्त झाले.

करीता सेवेशी हमीपत्र सादर

दिनांक :–

पालकाची स्वाक्षरी

वर्ग शिक्षक स्वाक्षरी

मु.अ. स्वाक्षरी

pc;2/reshma /Tembhurne sir/letterT